# नैसर्गिक एटू दूध व देशी गोवंशपालन यावर नवजीवनतर्फे १९ मे रोजी नारायणगाव येथे राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन

रायपाटण ( बातमीदार ) येथील शेती आणि शिक्षण यांचेसह राज्यस्तरावर गोवंशसंवर्धन कार्यात कार्यरत असलेल्या नवजीवन विकास सेवा संस्था व एटू प्रसारमंच पुणे या स्वयंसेवी संस्थांच्या वतीने दि. १९ मे रविवार रोजी नारायणगाव येथे राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेसाठी यावर्षी पुणे जिल्ह्यातील नारायणगाव येथील वसंतव्हीला या सभागृहाची निवड केली गेली आहे. रविवार दि. १९ मे रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वा. ही कार्यशाळा घेण्यात येणार आहे. यावर्षीच्या कार्यशाळेची संकल्पना श्री. चंदूकाका सराफ यांनी सुचविली आहे.

नवजीवन संस्था प्रतिवर्षी वार्षिक राज्यस्तरीय कार्यशाळा आयोजित करीत असते." देशी गोवंशपालन आणि नैसर्गिक आरोग्यदायी एटू दूध " या विषयावर यावर्षीची कार्यशाळा राष्ट्रीय पातळीवरील मान्यवर तज्ज्ञांच्या उपस्थितीत घेण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील जाणकार शेतकरी देशी जातीच्या भारतीय गोवंशाची गोपालनासाठी निवड करीत आहेत. या पार्श्वभूमीवर सेंद्रीय व नैसर्गिक एटू दूध व त्यासाठी देशी गोवंशाची निवड व संगोपन यावर सांगोपांग मार्गदर्शन करण्यात येणार आहे असे संयोजकांच्या वतीने एका पत्रकाद्वारे जाहिर करण्यात आले आहे.

नवजीवन विकास सेवा संस्थेने देशी गोवंशाच्या जागृतीसह गोसाक्षरता व गोविज्ञानाचा प्रसार या कार्यासाठी ता. लांजा ( जि. रत्नागिरी ), जि. पुणे, ता. फलटण ( जि. सातारा ) या ठिकाणी राज्यस्तरावर गोवंशप्रेमी ग्रामविकास संमेलनासह कार्यशाळांचे प्रतिवर्षी यशस्वी आयोजन केले आहे. नारायणगाव येथील कार्यशाळेसाठी डॉ. अशोक काळे ( एटू प्रसार मंच पुणे ) यांचेसह डॉ. सुरेंद्र रानडे ( संचालक इसाप संस्था गुजरात ) आणि डॉ. नितीन मार्कंडेय, डॉ. महादेव पाचेगावकर ( गोवंशसमृद्धी प्रचारक जि. लातूर ) श्री. मिलींद देवल ( गोवंशतज्ज्ञ पुणे.) यांचे मार्गदर्शन गोवंशप्रेमींना लाभणार आहे.